# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): हिंगोली
P.S. (पोलीस ठाणे): वसमत शहर
Year (वर्ष): 2026
FIR No. (प्रथम खबर क्र.): 0198
Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 24/03/2026 01:16 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): सोमवार
Date from (दिनांक पासून): 23/03/2026
Date To (दिनांक पर्यंत): 23/03/2026
Time Period (कालावधी):
Time From (वेळेपासून): 14:11 तास
Time To (वेळेपर्यंत): 16:30 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):
Date (दिनांक): 24/03/2026
Time (वेळ): 00: तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):
Entry No. (नोंद क्र.): 002
Date and Time(दिनांक आ वेळ): 24/03/202 00:54 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): दक्षिण, 01 कि.मी.
Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमत,वसमत-431512

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

(4)

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): सुलभा प्रल्हाद राउत

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1983 (d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , हिंगोली, हिंगोलीहिंगोली, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , हिंगोली, हिंगोलीहिंगोली, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-9922061123

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | शेख सलीम अब्दुल अहमद | | | 1. पिर बुरहान नगर गल्ली नं 8,Town/Village (शहर / गाव) नांदेड,Tehsil (तहसील): नांदेड,Police Station (पोलीस ठाणे): भाग्य नगर,District (जिल्हा): नांदेड,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून त करण्यातील विलंबाची कारणे ):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value Rs/-) मु (रु. म |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

सरकार तर्फे फिर्याद

ला.प्र.वि.कार्यालय हिंगोली. दिनांक 23/03/2026

मी, सुलभा प्रल्हाद राउत वय 43 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली मो.नं.9922061123 सरकार तर्फे फिर्यादी होऊन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन, फेब्रुवारी 2026 पासून पोलीस निरीक्षक म्हणुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे नेमणूकीस आहे.

मी दिनांक 23.03.2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय हिंगोली येथे हजर असतांना कार्यालयात हजर असले तक्रारदार अनिल किशन खंदारे, वय 41 वर्ष,व्यवसाय- लिपीक टंकलेखक, सिचंन व्यवस्थापन उपविभाग क्र. 3 हिंगो रा.जिनमाता नगर, हिंगोली यांनी आमच्याकडे तक्रार दिली की, मी सिंचन व्यवस्थापन उप विभाग क्रं. 3, हिंगोली येथे लिपीक/टंकलेखक म्हणुन नौकरी करतो. माझे वेतन व प्रवास भत्ता देयक पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर या कार्यालयातुन काढण्यात येत असते. मी जुलै ऑगस्ट 2025 चा प्रवास भत्ता देयक पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर येथे सादर केलेला आहे.

सदर कार्यालयातील वेतन शाखेतील वरीष्ठ लिपीक, सलीम शेख हयांनी माझे थकीत माहे जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर 2025 या तीन महिण्याचे पगारबील तयार करुन त्यावर उपकार्यकारी अभियंता, यांची स्वाक्षरी घेवुन कोषागार कार्यालयात सादर केले याचा मोबदला म्हणुन 1,000/- रुपये दयावे लागतील असे आमचे कार्यालयातील महाले यांन सलीम शेख यांनी सांगीतल्याने महाले यांनी मला दि.18.03.2026 रोजी तसा निरोप दिला.

आज रोजी मी आमचे कार्यालयातील कर्मचारी यांचे गोपनिय अहवाल आणनेकामी आमचे पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर येथे जाणार आहे. तेंव्हा सलीम शेख, वरीष्ठ लिपीक, पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर यांना भेटुन मी दाखल केलेल्या प्रवास बिला संदर्भात बोलणे करणार आहे. त्यावेळी सलीम शेख हे माझ्याकडे लाच मागणी करतील. सदर लाच रक्कम 1,000/-मला त्यांना देण्याची इच्छा नाही. त्यांच्याशी माझी कोणतीही वैयक्तिक दुष्मनी किंवा देण्या घेण्याचा आर्थीक व्यवहार नाही. त्यांना देण्यासाठी 1,000/- मी माझे बचतीमधुन सोबत आणले आहेत.

तरी श्री सलीम शेख, वरीष्ठ लिपीक, पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर यांनी किंवा त्यांच्या मार्फतीने ईतर कोणी

6

माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाई होणेस विंनती आहे. अशा आशयाची तक्रार दिल होती. सदरचे तक्रारी वरुन कारवाईचे अनुशंगाने जिल्हा पुरवठा विभाग जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली यांना दिलेल लेखी पत्रकान्वये त्यांनी त्यांचे कार्यालयाचे शासकिय कर्मचारी पंच 1) नितेश शंकरराव शिंदे, वय 30 वर्ष पद- लिपीक/टंकलेखक 2) दत्तात्रय सुर्यकांत चाभरेकर, वय 35 वर्ष, पद- लिपीक/टंकलेखक दोन्ही नेमणुक जिल्हा पुरवठा विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली असे ला.प्र.वि.हिंगोली कार्यालयात हजर आले.

दि.23.03.2026 रोजी लाप्रवि कार्यालय हिंगोली येथे तक्रारदार व वर नमुद दोन्ही पंच हजर असताना यातील तक्रारद यांनी त्यांची तक्रार पंचासमक्ष तोंडी कथन केली. तक्रारदार यांनी दिलेली तक्रार पंचानी वाचुन पाहिली. तक्रारदार यां तोंडी कथन केलेली तक्रार व टंकलिखीत केलेली तक्रार एकच असल्याचे खात्री झाल्याने त्यावर दोन्ही पंचानी सहया केल्या.

त्यानंतर तक्रारदार यांनी सांगीतले कि, ते आज रोजी त्यांचे हिंगोली येथील सिंचन विभागातील कर्मचारी यांचे गोपनिय अहवाल आणनेकामी ते पुर्णा पाटबंधारे विभाग वसमत येथे जाणार आहेत. व तेथे त्यांची आलोसे यांचेसोबत भेट होण आहे असे सांगीतले. त्यावरुन आम्ही सोबत मा. पोलीस उप अधीक्षक श्री. विकास घनवट कार्यालयीन स्टॉफ पोलीस अंमलदार गजानन पवार, गोविंद शिंदे, विनोद पुंडगे, अमोल जाधव व चालक पोलीस हवालदार शेख अकबर नमुद दो पंच व तक्रारदार असे दोन वेगवेगळ्या शासकिय वाहनाने तक्रार पडताळणी व सापळा कार्यवाही करीता लागणारे सर्व आवश्यक साहीत्य सोबत घेवुन लाप्रवी कार्यालय हिंगोली येथुन वसमतकडे निघालो आम्ही सर्व वसमत शहरातील वसमत रेल्वे स्टेशन रोडवरील गुरुद्वारा या ठिकाणी आमचे शासकिय वाहने थांबवुन आमच्या सुचनेवरून पोशि श्री पुं यांनी तक्रारदार व दोन्ही पंचाना व्हॉईस रेकॉर्डर बाबत व त्यामध्ये वापरण्यात येणा-या मेमरीकार्ड बाबत माहिती दिली त्यानंतर अंदाजे 14.52 वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून तक्रारदार श्री अनिल खंदारे यांचे अंगातील बनियनच्या आती बाजुस कापडी पिशवीत टाकुन आडकवुन देवुन, तक्रारदार अनिल खंदारे व पंच क्र. 1 श्री शिंदे यांना लोकसेवक शेख सलीम अब्दुल अहमद यांची त्यांच्या पुर्णा पाटबंधारे विभाग कार्यालय वसमत येथे भेट घेण्याकरीता तक्रारदार यांना एका शासकिय वाहनाने पडताळणी पथक थांबलेल्या वसमत रेल्वे स्टेशन रोडवरील गुरुद्वारा या ठिकानावरुन रवाना केले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार खंदारे व पंच क्र. 01 शिंदे असे तक्रारदार यांच्यासोबत शासकिय वाहनाने पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमत येथे गेले.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 शिंदे हे पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले, तेव्हा पोशि श्री पुंडगे यांनी तक्रारदार अनिल खंदारे यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर अंदाजे 15.33 वा. बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर तक्रारदा श्री अनिल खंदारे व पंच क्र.1 शिंदे यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली. त्यावेळी पंच क्र. 1 श्री शिंदे यांनी सांगितले की, तक्रारदार व लोकसेवक शेख सलीम यांची पुर्णा पाटबंधारे विभाग वसमत येथील कॅबीनमध्ये भेट झाली. तक्रारदार हे त्यांच्या कामासंबधाने बोलणे झाले त्या भेटी दरम्यान लोकसेवक शेख सलीम हे तक्रारदार अनिल खंदारे यांना म्हणाले की, जे काही लोक देतात ते तुम्हाला दयावे लागतील पैसे... अर तका्ररदार अनिल खंदारे यांना म्हणाले असता, तक्रारदार अनिल खंदारे त्यांना बर असे म्हणाले असता लोकसेवक शेख सलीम हे त्यांना म्हणाले की, नाही तर तुम्हाला वाटत असल की असच होवुन जाईल.... होत नाही बर ते... त्या तक्रारदार खंदारे बर... बर असे म्हणाले असता, लोकसेवक शेख सलीम हे त्यांना म्हणाले की, तुमचे साहेब सुध्दा देतात, साहेबांना विचारुन दया... दुस-या कोणालाही विचारु नका... असे म्हणाले.

त्यानंतर तक्रारदार खंदारे यांनी पंचा समक्ष लोकसेवक शेख सलीम यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांच्या फोन वरुन महले यांना फोन करुन त्यांचा मोबाईलचा स्पिकर ऑन करुन बोलणे केले असता, महले यांनी लोकसेवक शेख सलीम यां 1,000/- रुपये दिल्याचे सांगितल्याने, लोकसेवक शेख सलीम हे तक्रारदार खंदारे यांचेकडे 1,000/-रू. लाचेची मागण करुन लाच रक्कम आजच स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर तक्रारदार यांच्या सांगण्याप्रमाणे लोकसेवक शेख सलीम, वरीष्ठ लिपीक यांची पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमत येथील कार्यालयात भेट होईल असे सांगितल्याने लोकसेवक शेख सलीम यांच्या विरुध्द पुर्णा पाटबंधारे विभाग वसम येथील कार्यालयातील सापळा कारवाई आजमावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी सापळा पुर्व कारवाईला सुरवात केली. पोह श्री शिंदे यांनी तक्रारदार व दोन्ही पंचासमक्ष अँन्थ्रॉसिन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट लॅम्पच्या गुणधर्माबाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईच्य अनुशंगाने तक्रारदार, पंच व सापळा पथकातील अंमलदाराना सुचना दिल्या. लोकसेवक शेख सलीम यांनी तक्रारदार अनिल खंदारे यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारल्याबाबत इशारा म्हणुन हात रुमालाने तोंड पुसने बाबत तक्रारदार यांना सुचना दिली. त्यानंतर पोह शिंदे यांनी लाच रक्कमेला अँन्थ्रॉसिन पाव लावुन तक्रारदार यांच्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात अलगत ठेवुन दिल्या.

त्यानंतर तक्रारदार यांच्याकडे 16.11 वाजता व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन पंच क्र. 1 शिंदे यांच्यासोबत लोकसेवव

7

शेख सलीम यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार खंदारे यांना शासकिय वाहन क्र. एम.एच.33 सि 279 ने पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमत येथे रवाना केले. त्यांच्या पाठोपाठ काही अंतराने आम्ही व सापळा पथकातील पोलीस उपअधीक्षक विकास घनवट, पोह श्री पवार, पोशि श्री. पुंडगे, पोशि श्री. जाधव व पंच क्रं.2 श्री चाभरेकर असे शासकिय वाहन क्र.एम.एच.38 एडी 4337 ने वसमत रेल्वे स्टेशन रोडने पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमतकडे रवाना झालो. तेथे गेल्याव काही अंतरावर तक्रारदार व पंच क्रमांक 1 श्री शिंदे हे शासकिय वाहनातुन खाली उतरुन, पायी चालत पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमत कार्यालयाचे दिशेने गेले. त्यावेळी आम्ही व सापळा पथकातील अंमलदार असे गवळी मारुती हनुमान मंदिराच्या बाजुला रोडवर शासकिय वाहन बाजुला उभे करुन तक्रारदार व पंच क्र. 1 शिंदे यांच्या पाठीमागे काही अंतराने पायी चालत पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमत कार्यालयाच्या आवारात जाउन तिथे कोणासही संशय येणार नाह अशा प्रकारे सापळा लावला.

थोडया वेळाने अंदाजे 16.30 वाजता तक्रारदार खंदारे यांच्याकडुन लोकसेवक शेख सलीम, वरीष्ठ लिपीक यांनी पंचासमक्ष स्वतः 1,000/- रु. लाच रक्कम स्विकारली असता, तक्रारदार यांनी त्यांना सांगीतल्याप्रमाणे लाच स्विकारल बाबत त्यांचा हात रुमालाने तोंड पुसुन सापळा पथकास इशारा केला. त्यावेळी आम्ही, लोकसेवक, शेख सलीम यांना पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमत कार्यालयातील त्यांच्या कॅबीनमध्ये ताब्यात घेतले. त्यावेळी सापळा पथकातील पोशि पुंडगे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर आम्ही आमचा, पंचाचा व साप पथकातील सदस्याचा परिचय देवुन लोकसेवक शेख सलीमे यांना त्यांचा नाव, गाव पत्ता विचारला असता त्यांनी शेख सलीम अब्दुल अहमद वय 45 वर्श, व्यवसाय नौकरी पद- वरिष्ठ लिपीक, पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमत ता. वसमत जि.हिंगोली रा. पिर बुरहान नगर, गल्ली नं.8 नांदेड जि.नांदेड असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर स्विकारलेल्या लाचेच रक्कमेबाबत विचारपुस केली असता त्यांनी स्विकारलेली अँन्थ्रॉसिन पावडर युक्त 1,000/- रू लाच रक्कम त्यांचे शर्टच्य डाव्या खिशातुन काढुन दिल्याने ती पंचा समक्ष हस्तगत करण्यात आली आहे. सदर बाबत सविस्तर सापळा कारवाई पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी तक्रारदार श्री. अनिल किशन खंदारे, वय 41 वर्ष, व्यवसाय- लिपीक टंकलेखक, सिचंन व्यवस्थापन उपविभाग क्र 3 हिंगोली रा. जिनमाता नगर, हिंगोली यांनी दिनांक 23.03.2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे दिलेल्या तक्रारीवरुन, दिनांक 23.03.2026 रोजी करण्यात आलेला पडताळणी पचंनामा, सापळा पुर्व व सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक, शेख सलीम अब्दुल अहमद वय 45 वर्ष, व्यवसाय नौकरी पद- वरिष्ठ लिपीक, पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमत ता. वसमत जि.हिंगोली रा. पिर बुरहान नगर, गल्ली नं.8 नांदेड जि.नांदेड यांनी तक्रारद अनिल खंदारे यांना तिन महिन्याचे वेतन काढुन दिल्याचा मोबदला म्हणुन 1,000/- रु. लाचेची मागणी करून, आज दिनांक 23.03.2026 रोजी 16.30 वा.चे सुमारास सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार खंदारे यांच्याकडुन पुर्णा पाटबंधारे विभाग, कार्यालय वसमत येथील त्यांच्या कॅबीनमध्ये 1,000/- रू लाच रक्कम पंचा समक्ष स्वतः स्विकारली आहे.

आरोपी लोकसेवक, शेख सलीम अब्दुल अहमद वय 45 वर्ष, व्यवसाय नौकरी पद- वरिष्ठ लिपीक, पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमत ता. वसमत जि.हिंगोली रा. पिर बुरहान नगर, गल्ली नं.8 नांदेड जि.नांदेड यांनी तक्रारदार अनिल खंदा यांच्याकडुन स्वताः लाच रक्कम स्विकारली म्हणुन त्यांचे विरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

सुलभा राउत,पोलीस निरीक्षक ला.प्र.वि.हिंगोली

13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):

(1) Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा):

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): RAJESH HANMANLU MALPILU Rank (हुद्दा): पोलीस उपनिरीक्षक

No. (क्र.): 15101000402RHMM8502 to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)

(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/ खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): SUDHIR SAMADHAN WAGH

पोलीस ठाणे अंमलदार पोलीस स्टेशन वसमत (शहर)

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): PI

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen ) (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1981 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखा सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |